| MHPU240001522021 | नि.दि.दावा क्र.२९/२०२१<br>दगडू<br>वि.<br>विठ्ठल व इतर |
|---|---|

<u>निशाणी क्र.२२ वरील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दावा मिळकतीची मोजणी होवून मिळणेसाठी कोर्ट कमिशन यांची नियुक्ती होवून मिळण्यासाठी केलेला आहे.

२. प्रतिवादींना पुरेशी संधी देवूनही त्यांनी अर्जास म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे, त्यांचे म्हणण्याशिवाय अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

३. वादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे युक्तीवाद नाही.

४. वादीतर्फे केलेल्या युक्तीवादाचा अभिलेखाशी विचार करता असे दिसुन येते की, दावा हा अतिक्रमण काढून मिळणेसाठी आहे. त्यामुळे दावा मिळकतीवर अतिक्रमण झाले किंवा नाही, हे ठरविण्यासाठी कोर्ट कमिशनर यांची मोजणी करण्यासाठी नियुक्ती करणे ऊचित होते. दावा जमीन गट क्र. ७०० सोबत गट क्र ६९९, ६२९, ६३०, ६३१, ६३६, ६०४, ७०१ व ६२४, ६२५, ६२६, ६२७, ६२८ ची एकत्रीत मोजणी करण्याबाबत वादीने विनंती केलेली आहे. कोर्ट कमिशनर यांची फी भरण्यास वादीतर्फे विधीज्ञांनी संमती दर्शविलेली आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने व दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी अर्ज

मंजूर करणे उचित होते. या सर्व बाबींचा विचार करुन पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येतो –

| | |
|---|---|
| अ. | तालुका निरीक्षक भूमीअभिलेख, घोडेगाव यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येते. |
| ब. | कोर्ट कमिशनर यांनी मौजे नारोडी येथील गट क्र. ७०० सोबत गट क्र ६९९, ६२९, ६३०, ६३१, ६३६, ६०४, ७०१ व ६२४, ६२५, ६२६, ६२७, ६२८ ची एकत्रीत मोजणी करण्याची आहे. |
| क. | मोजणी करण्यापुर्वी कोर्ट कमिशनर यांनी सर्व गटधारक व लगतधारक यांना नोटीस पाठविण्याची आहे. |
| ड. | वादीने कोर्ट कमिशनर यांची फी भरुन आवश्यक ती कागदपत्रे पुरवुन तजवीज करण्याची आहे. फी भरल्याबाबतची पावती न चुकता प्रकरणात दाखल करण्याची आहे. |
| इ. | कोर्ट कमिशनर यांनी वर नमुद केल्याप्रमाणे मोजणी करुन अहवाल सादर करण्याचा आहे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
PATIL AVINASH
MADHUKAR
Date: 2025.07.24
17:19:51 +0530

**[अविनाश म. पाटील]**

दिनांक : २४/०७/२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Gaurav A. Bobade. |
| Name of Court | : Shri. Avinash M. Patil.<br>Civil Judge Junior Division,<br>Ghodegaon. |
| Dictated and typed on | : 24.07.2025. |
| Corrected on | : 24.07.2025. |
| Signed on | : 24.07.2025. |